**मालेगाव शहरातील सर्वे नं.१६९ मधील उर्दू शाळा क्र.६४ च्या जवळील २०,००० चौ.फु क्षेत्रफळाचा भूखंडावर उर्दू घर बांधण्याचा रु.४.०० (रुपय चार कोटी मात्र) किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.....**

# महाराष्ट्र शासन

## अल्पसंख्याक विकास विभाग

## शासन निर्णय क्रमांकः अविवि २०१५/प्र.क्र.५५/कार्या-४,

मादाम कामा रोड, हुतात्मा चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
तारीख: २१ मे, २०१५

**वाचा**

आयुक्त, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, जि.नाशिक यांचे पत्र क्र साबावि/ अ.स./०७/२०१५,दि.२८.१.२०१५.

**प्रस्तावना**

आयुक्त, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, जि.नाशिक यांनी त्यांच्या उपरोल्लेखित पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन, मालेगाव शहरातील सर्वे नं.१६९ मधील उर्दू शाळा क्र.६४ च्या जवळील २०,००० चौ.फु क्षेत्रफळाचा भूखंडावर उर्दू घर बांधण्याच्या रु.४.०० (रुपये चार कोटी फक्त) इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

## शासन निर्णय

१. मालेगाव शहरातील सर्वे नं.१६९ मधील उर्दू शाळा क्र.६४ च्या जवळील २०,००० चौ.फु क्षेत्रफळाचा भूखंडावर उर्दू घर बांधण्याचा रु.४.०० (रुपये चार कोटी फक्त) इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. सदर प्रशासकीय मान्यता प्राप्त किंमतीचा तपशील पुढील प्रमाणे आहे -

| अ.क्र. | कामाचे नाव | परिमाण/किंमत |
|---|---|---|
| १ | मुख्य इमारत | |
| | इमारतीचे क्षेत्रु फळ (चौरस मीटर) | १७८६.०० चौ.मी. |
| | प्रति चौरस मीटर बांधकामाचा दर | ११,२२६ |
| | बांधकामाची किंमत | २,०१,२०,९२३.६५ |
| २ | विद्युतीकरण | |
| | अ) बाहय (स्ट्रीट लाईट, एम.एस.ई.बी.चार्जेस, डी.जी.सेट.) | १०,००,००० |
| | ब) अंतर्गत (स्ट्रीट लाईट, एम.एस.ई.बी.चार्जेस, डी.जी.सेट.) ११% | ८,००,००० |
| ३ | पाणी पुरवठा व स्वच्छता | ७,५०,००० |
| ४ | संरक्षक भिंत (कम्पाऊंड वॉल ) आणि द्वार | ११,१९,८७६.३५ |
| ५ | नकाशा (ले- आऊट) अनुसार अंतर्गत रस्ते | २,००,००० |
| ६ | सौर उर्जा प्रणाली | ०.०० |
| ७ | फर्निचर | ४,००,००० |
| ८ | पार्कींग | ०.०० |
| ९ | रेन वॉटर हार्वेस्टिंग | ५,००,००० |

| अ.क्र. | कामाचे नाव | परिमाण/किंमत |
|---|---|---|
| १० | अग्निशमन यंत्रणा (फायर फाईटिंग अरेन्जमेंट ) ७% | ७,५०,००० |
| ११ | एलिवेशन ट्रिटमेंट | १५,३६,८०० |
| १२ | अंतर्गत काम (इंटरेअर वर्क) | ९२,२२,४०० |
| | **एकूण** | **४,००,००,०००** |

२. सदर प्रकरणी होणारा खर्च मागणी क्रमांक झेडई-१ - २२३५ - सामाजिक सुरक्षा व कल्याण - २०० - इतर कार्यक्रम - राज्य योजनांतर्गत योजना - (००) - (००) (१८) - उर्दु घरासाठी सहायक अनुदाने (२२३५ ए ५५२) या लेखा शिर्षाखाली टाकण्यात यावा व त्याखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर उर्दू घराचे बांधकाम कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मालेगाव, जि.नाशिक यांच्याकडून करण्यात येईल. या कामासाठीचा निधी जिल्हाधिकारी, नाशिक याचेकडे यथावकाश सुपूर्द करण्यात येईल व त्याकरिता निवासी उप-जिल्हाधिकारी, नाशिक हे “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून आणि जिल्हाधिकारी, नाशिक हे “नियंत्रक अधिकारी” म्हणून काम पाहतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०५२११५५०१९५९१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

५. महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anees Iqbal Ismail Shaikh

Digitally signed by Anees Iqbal Ismail Shaikh
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=447981acddcc5079f9c00eadfad2054d955a80a21de6164c4024daf5a9ea2c97, cn=Anees Iqbal Ismail Shaikh
Date: 2015.05.21 16:59:46 +05'30'

**( अनिस शेख )**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. महालेखापाल-१/२ ( लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर,
२. आयुक्त, नाशिक महसूल विभाग, नाशिक,
३. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,
४. आयुक्त, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव,
५. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई,
६. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मालेगाव, जि.नाशिक,
७. जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक,
८. अधीक्षक-नि-कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमी, मुंबई,
९. स्वीय सहायक, प्रधान सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०. स्वीय सहायक, सह सचिव (अ.वि.वि.), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
११. स्वीय सहायक, उप सचिव (अ.वि.वि.), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२. कक्ष अधिकारी (का-७). अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३. वित्त विभाग / नियोजन विभाग / सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४. निवड नस्ती (का-४)/कार्यासन-४, संग्रहार्थ.